# प्रेसनोट

जा. क्र. १०५/ माहिती कक्ष/ वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १३/०२/२०१७

## ''मोबाईल पोलीस स्टेशन''
## (फिरते पोलीस स्टेशन)

भंडारा:— पोलीस विभाग भंडारा चे वतीने भंडारा जिल्हात पोलीस अधीक्षक,भंडारा श्रीमती विनीता साहू यांचे संकल्पनेतून ''मोबाईल पोलीस स्टेशन'' (फिरते पोलीस स्टेशन) लोकार्पन आज दिनांक ११/०२/२०१७ रोजी भंडारा जिल्हातील पोलीस स्टेशन पवनी (ग्राम काकेपार), अडयाळ (चिचाळ), लाखांदुर (मोहरर्णा), दिघोरी( दांडेगाव), तुमसर (तितरा), आंधळगाव (अकोला टोला), सिहोरा (चुल्हाळ), गोबरवाही (लोभी), साकोली (पळसपाणी), लाखनी (रेंगेपार कोटा ), वरठी ( दाभा ), करडी (पालोरा), जवाहरनगर (कवळसी), मोहाडी (हरदोली), कारधा (मानेगाव), पालांदुर (पाहुलदवना), भंडारा (गणेशपुर), या ठिकाणी पोलीस स्टेशनचे अधीकारी व बिट जमादार यांचे मार्फतीने सदर मोहीम उत्कृष्टपणे राबविण्यात आलेली आहे. सदर मोहीमेस गावातील पोलीस पाटील, सरपंच, पोलीस मित्र, माहात्मा गांधी तंटामुक्त गाव समिती अध्यक्ष/ सदस्यगण व सामाजिक कार्यकर्ते, स्थानिक आणि आजुबाजूचे गाव/ परीसरातील सर्व नागरिकांनी चांगला प्रतिसाद दिलेला आहे. सदर मोहीमेत नागरीकांच्या एकुण ०७ तक्रारी नोंदविल्या असून तक्रारीचे निराकरण करण्यात आलेले आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
**प्रभारी पोलीस उपअधिक्षक**(गृह)
**भंडारा**
**दुरध्वनी.क्र.** ९९८७३८८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.